# जनसंपर्क अधिकारी


पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक २३०/२०२४** **दिनांक-१९/०६/२०२४**

## "०३ वर्षापासुन अंमली पदार्थ विक्रीतील पाहिजे असलेल्या म्होरक्यास मध्यवर्ती गुन्हे शाखेकडून अटक"

दिनांक १४/०७/२०२१ रोजी १५.३५ वा. शिवार गार्डन समोरील रोडवर मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत अ.मा.वा.प्रति.कक्ष, चे अधिकारी व अंमलदार यांनी अवैध गांजा विक्री करण्यासाठी आलेल्या १) विनयकुमार ब्रम्हदेव पाठक, २) प्रतिक कानुभाई पटेल, ३) राजु पुन्नास्वामी देवर यांना यापुर्वीच अटक करुन त्यांचे कडुन १,४४,३८०/- रु. अंमली पदार्थ (गांजा) व मोटर सायकल असा माला हस्तगत करण्यात आला असुन सदर बाबत मिरारोड पोलीस ठाणे ा २४४/२०२१, एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २० (अ) प्रमाणे दिनांक १५/०७/२०२१ रोजी पोहवा/१९८७, विजय विनायक ढेमरे यांचे सरकार तर्फे फिर्यादी वरुन सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील प्रमाणे गुन्हयातील अटक आरोपीतांना अंमली पदार्थ (गांजा) विक्री करीता पुरविणारा त्यांचा मोरक्या १) कृष्णा नायडु, व त्याचे साथीदार २) राजु नायडु, ३) श्याम पुर्ण नांव व पत्ता माहित नाही असे आज तागायत पोलीसांना गुंगारा देत होते.

मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी आयुक्तालयाचे रेकॉर्ड वरील पाहिजे/फरारी आरोपी यांना अटक करण्याबाबत मार्गदर्शन करुन सुचना दिल्या होत्या. सदर सुचनांची व मार्गदर्शना प्रमाणे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. राहुल राख यांनी पोलीस पथक तयार करुन त्यांना सुचना दिल्यानुसार पोलीस उप निरीक्षक हितेंद्र विचारे, पोहवा/मनोहर तावरे, पोहवा/आसिफ मुल्ला, पोहवा/संग्रामसिंह गायकवाड यांनी वरील गुन्हयातील पाहिजे आरोपी अंमली पदार्थ (गांजा) विक्री करीता पुरविणारा त्यांचा मोरक्या १) कृष्णा नायडु याचेबाबत गुप्तबातमीदारा मार्फत माहिती प्राप्त करुन पेणकरपाडा रोड, दहिसर चेक नाका या ठिकाणी सापळा लावुन आरोपी कृष्णा राजु नायडू, रा. पुष्पा विहार कॉलणी, रुम नं १६१, आंबावाडी, दहिसर पुर्व यास दिनांक १९/०६/२०२४ रोजी १४.०० वा. शिताफिने ताब्यात घेण्यात आले आहे. सदर आरोपीस पुढिल कार्यवाहीकामी मिरारोड पोलीस स्टेशन येथे रिपोर्ट सह हजर करण्यात आले आहे.

सदरची कारवाई श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) (अतिरिक्त कार्यभार), श्री. भास्कर पुकळे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) (अतिरिक्त कार्यभार) यांचे मार्गदर्शखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पो.नि./राहुल राख, पोउपनिरी/ हितेंद्र विचारे, सहा.पो.उपनिरी/ श्रीमंत जेधे, पोहवा/मनोहर तावरे, पोहवा/आसिफ मुल्ला, पोहवा/संग्राम गायकवाड, पोहवा/हनुमंत सुर्यवंशी, पोअं/अंगद मुळे, मसुब/ सचिन चौधरी यांनी केली आहे.

------------000000-----------